**प्रेसनोट** दि.०७/०८/२०१९

## बिबवेवाडी पोलीस ठाणे पुणे शहर

## गणपती उस्तव साजरे करणारे मंडळाची बैठक घेतले बाबत

आज दिनांक ०७/०८/२०१९ रोजी सायंकाळी १८.०० ते १८.३० वा चे दरम्यान बिबवेवाडी पोलीस ठाणे येथे कम्युनिटीग पोलीसींग च्या अनुशंगाने गणपती उत्सवा निमित्त गणेश उत्सव साजरी करणा-या मंडळाची बैठक आयोजित करण्यात आली होती.सदर बैठकी मध्ये वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री मुरलीधर करपे यांनी १) गणेश उत्सव साजरा करताना दोन स्पिकर बॉक्स पेक्षा जास्त स्पिकर लावण्यात येवू नये २) डी जे डॉल्बीचा वापर करण्यात येवू नये आवाजाची तिव्रता वाढल्यास ध्वनी प्रदुषण कायदयान्वये कारवाई करण्यात येईल ३) वाहतुकीस अडथळा होणार नाही याची दक्षता घ्यावी. ४) सी.सी.टी.व्ही कॅमेरे बसवावेत मुर्तीच्या संरक्षणासाठी २४ तास स्वयंसेवक नेमावेत ५) मुख्य मिरवणूकीत सामील होणा-या मंडळांनी आपल्या सजावटीचा आकार कमी करावा ६) गणपती मंडळांनी मंडपाचा आकार सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्वा नुसार रस्त्याचा एक तृतीअंश भाग उपयोगात आणुन बांधावा ७) श्री मुर्तीचे अग्णी पासुन पावसा पासुन संरक्षण होईल याची दक्षता घ्यावी ८) विद्युत परवानगी घ्यावी ९) धर्मदाय आयुक्त यांच्याकडे मंडळाची नोंदणी करावी १०) मंडळानी परवनगी करीता अर्ज एक खिडकी योजना अंतर्गत करण्यात आलेली आहे. ११) मंडळा करीता वर्गणी गोळा करताना कोणत्याही नागरीकांस त्रास होणार नाही याची काळजी घ्यावी १२) सर्व मंडळांनी ऑनलाईन अर्ज भरावेत तसेच त्यांना पोलीसांनी सुरु केलेल्या सेवांबाबत भरोसा सेल, महिला सुरक्षा, कम्युनिटि पोलीसींग, रक्षा ॲप, सेवा ॲप, बडी कॉप, पोलीस काका, अंतर्गत सुरु असणारे योजनांची त्यांना माहिती दिली व त्याबाबत त्यांचे अभिप्राय जाणून घेतले. व गणेश उत्सव शांततेत पार पाडावा पोलीस ठाणे हद्दीत कोणताही अनुचित प्रकार घडल्यास त्याबाबत आम्हास तात्काळ कळविणे बाबत आव्हाण केले आहे.

सदर बैठकीस वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री मुरलीधर करपे, व गोपनीयचे कर्मचारी यांच्यासह गणपती उत्सव साजरा करणा-या मंडळाचे अध्यक्ष व कार्यकर्ते असे १२५ ते १५० सदस्य हजर होते.




